महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १६ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३१७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# अवकाळी पावसाने जिल्ह्यातील वीटभट्टी मालक संकटात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ।** भिवंडी शहर आणि ग्रामीण भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह ढगांच्या गडगडाटाने आणि विजांच्या कडकडाटाने या आठवड्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसाने वीटभट्टी मालकांवर अवकळा आल्याची स्थिती झाली आहे. आधून मधून झालेल्या संतत धारेने वीटभट्टीच्या शेवटच्या टप्प्यात या व्यवसायाला चांगलाच तडाखा दिला आहे. त्यामुळे वीटभटी मालकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. एप्रिल- मे या महिन्यात कडक उन्हाळा असल्याने विटांचे उत्पादन मोठ्या संख्येने घेता येते. त्याच प्रमाणे या उन्हाळी वातावरणात कच्च्या विटा सुकल्यानंतर ग्रामीण भागात विटांच्या भट्ट्या देखील मोठ्या संख्येने लावल्या जातात. या पोषक वातावरणात विटा उत्तमप्रकारे भाजून निघतात. एकाचवेळी भट्ट्या लावण्यासाठी काही व्यावसायिक केवळ भट्ट्या रचून देखील ठेवतात. मात्र मंगळवारी झालेल्या अवकाळी पावसाने मातीच्या कच्च्या विटांचा तयार माल पावसात भिजून संपूर्ण विटांच्या मालाची नासधूस झाली आहे. मंगळवारी रात्रीपासून अचानकपणे सुरु झालेल्या अवकाळी पावसापासून रचलेल्या भट्ट्यांचे नुकसान होऊ नये म्हणून विट मालक आणि कामगार यांची कच्च्या विटांवर ताडपत्री आणि



प्लास्टिक कापड टाकण्यासाठी धावपळ झाली.अचानक अवकाळी पाऊस सुरु झाल्याने मे आणि जून महिन्याचे उत्पादन कसे घेता येईल ? अशी चिंता वीट मालकांना सतावू लागली आहे.

वीट कामगार हे वीट कामासाठी येण्या अगोदर हिवाळा आणि उन्हाळ्याच्या दोन्ही हंगामाचे आगाऊ पैसे घेतात. त्याशिवाय काम करीत नसल्याने झालेले नुकसान कसे भरून येईल ? तसेच पावसात भिजलेल्या विटांचे देखील नुकसान झाले आहे. असा दुहेरी फटका वीट व्यावसायिकांना बसला आहे. विट व्यवसाय हा शेतकऱ्यांचा जोडधंदा असून शेतीची कामे संपल्यानंतर शेतामध्ये वीट व्यवसायास सुरुवात केली जाते. मात्र यावेळी जून मध्ये सुरु होणार पाऊस मे महिन्यात सुरु झाल्याने शेतकऱ्यांचे व्यावसायिक गणित बिघडले आहे. गेल्या काही दिवसांपासून हवामान खाते अंदाज देत होते. परंतु पावसाच्या लहरी पणामुळे शेतकऱ्यांनी याची दाखल घेतली नाही. त्यामुळे त्यांना नुकसानीला समोरे जावे लागले आहे. मात्र गेल्या तीन महिन्यापासून उन्हाच्या काहिलीने त्रस्त झालेल्या नागरिकांना मंगळवारपासून सुरु झालेल्या अवकाळी पावसाने दिलासा मिळाला असून मंगळवारी रात्रीच्या अचानक झालेल्या पावसाने हवेत अचानक गारवा पसरला होता.त्यातच ग्रामीण भागात वीज गेल्याने शहर व ग्रामीण परिसर अंधारात बुडाले होते.


# महापालिका निवडणुकींसाठी राज्य सरकारच्या हालचाली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मागील तीन वर्षांपासून राज्यातील अनेक जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांच्या आत निवडणूक घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. चार आठवड्यात अधिसूचना जारी करा आणि पुढील चार महिन्यांत निवडणुका घ्या, असे सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला आदेश दिले आहेत. त्यामुळं आता राज्य निवडणूक आयोग देखिल सक्रिय झाला असून, याबाबत निवडणूक घेण्यासाठी राज्य सरकारकडून हालचाली होत असल्याचं दिसून येत आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे सरकारला आदेश : दरम्यान, सर्वोच्च न्यायालयानं राज्य निवडणूक आयोगाला आदेश दिल्यानंतर आता राज्य निवडणूक आयोग अॅक्शन मोडवर आले आहे. "राज्यातील निवडणुका घेण्यासाठी नगर परिषदा, नगर पंचायती आणि महापालिकेच्या प्रभाग रचना तयार करण्याची कार्यवाही तातडीनं सुरू करा, असे आदेश राज्य निवडणूक आयोगानं राज्य सरकारला बुधवारी दिले आहेत. याव्यतिरिक्त पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्या निवडणुका घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या गट आणि पंचायत समित्यांच्या गणांची रचना करण्याचेही आदेश राज्य निवडणूक आयोगानं राज्य सरकारला दिले आहेत. याबाबत सविस्तर पत्र आयोगानं बुधवारी राज्य सरकारला लिहिलं आहे," अशी माहिती निवडणूक आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे यांनी "ईटीव्ही भारत"शी बोलताना दिली आहे. त्यामुळं आता महानगर पालिकांची प्रभाग रचना आणि गट फेररचना करण्याची प्रक्रिया राज्य सरकारला करावी लागणार आहे.

दुसरीकडं मागील तीन वर्षांपासून ओबीसी आरक्षणामुळं राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका होऊ शकल्या नाहीत. याबाबत निवडणुका होण्यासाठी लोकांनी न्यायालयात धाव घेतली होती. अखेर मागील आठवड्यात सर्वोच्च न्यायालयानं याबाबत राज्य निवडणूक आयोगाला आदेश देताना पुढील चार आठवड्यात अधिसूचना जारी करा आणि चार महिन्यात पालिका निवडणूक घेण्याचे आदेश दिले होते.




## यशवंत पंचायतराज अभियानात शहापूर पंचायत समिती प्रथम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'यशवंत पंचायतराज अभियान २०२३-२४' अंतर्गत पंचायत समिती शहापूर, जिल्हा परिषद ठाणे यांनी कोकण विभागातून प्रथम क्रमांक पटकावून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. याअंतर्गत शहापूर पंचायत समितीला ११ लाख रुपयांचे पारितोषिक घोषित करण्यात आले आहे.

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायतराज संस्थांचे योगदान मोठे आहे. राज्यामधील विकासाच्या प्रमुख योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. पंचायत राज संस्थांना त्यांनी केलेल्या कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता अधिक वाढविणे व त्यांच्यामध्ये उत्कृष्ट कामांची स्पर्धा निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यात पंचायत राज संस्थांचे व्यवस्थापन व विकास कार्यात अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींसाठी सन २००५/ २००६ या आर्थिक वर्षापासून विभागस्तर व राज्यस्तरावर यशवंत पंचायत राज अभियान ही पुरस्कार योजना सुरू करण्यात आलेली आहे.

सन २०२३-२४ या वर्षापासून पुरस्कार योजनेचे नाव यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान असे करण्याचा निर्णय शासनाने घेतला. पंचायत राज




> हा पुरस्कार म्हणजे आमच्या टीमच्या एकत्रित मेहनतीचे फलित आहे. आम्ही भविष्यातही विकासकामांमध्ये नावीन्य व गुणवत्ता जपण्याचा प्रयत्न करत राहू.
> - नम्रता जगताप
> गटविकास अधिकारी
> शहापूर पंचायत समिती

प्रशासन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जि.प. व पंचायत समित्या यांनी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये केलेल्या कामाचे मूल्यमापन विचारात घेऊन महसुली विभागस्तर व राज्यस्तर अशा दोन स्तरावर यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान ही अभिनव पुरस्कार योजना राबविण्यात आली. कोकण विभागात शहापूर पं.स.ला हा पुरस्कार जाहीर केला. पंचायत समिती शहापूरचे तत्कालीन गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांनी लोकसहभाग, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शक प्रशासनात उल्लेखनीय कार्यगती साधल्यामुळे त्यांची निवड करण्यात आली आहे.

# खडवलीतील अनाधिकृत बांधकामांवर बुलडोझर
## २६० चाळीतील घरांसह शेकडी दगडी जोते जमिनदोस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** कल्याण तालुक्यातील खडवली जवळील नडगांव गावाच्या हद्दीतील सर्व्हे नंबर ११ हि महसूलची मिळकत आदिवासी बांधवांना शेतीसाठी वाटप करण्यात आली होती. मात्र त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत बिगर शेतकी वापर करत काही धनिक व बांधकाम व्यावसायिकांनी त्यांना तुटपुंजा मोबदला देत मोठ्या प्रमाणात अनाधिकृतपणे शेकडो चाळींची बांधकामं करून विक्री केली होती.



या बांधकामां बाबत सामाजिक कार्यकर्ते निखिल कशिवले यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली होती. हायकोर्टाने सदर बांधकामे तात्काळ निकसित करण्यात यावीत अशा प्रकारचा आदेश पारित केल्यानंतर ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या सुचनेनुसार कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार सत्यजित चव्हाण व कल्याण तालुका पोलिस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांच्या देखरेखीखाली ही कल्याण तालुक्याच्या ग्रामीण भागातील अनाधिकृत बांधकामांवरील सर्वात मोठी कारवाई करण्यात आली.

सदर कारवाईत २६० चाळीतील घर व शेकडो दगडी ज्योती भुईसपाट करण्यात आली आहेत. या कारवाईमुळे मात्र अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यवसायिक व धनिकांचे मात्र चांगलेच धाबे दणाणले आहेत.

ज्यांनी ज्यांनी ही बांधकामे केली होती त्यांच्यावर गुन्हे देखील दाखल करण्यात येणार असल्याचे सुत्रांकडून समजतयं. या कारवाईसाठी दोन नायब तहसीलदार, सहा मंडळ अधिकारी, ३० तलाठी, सहा महसूल कर्मचारी, एक वरिष्ठ पोलीस निरीक्षक, इतर ८ अधिकारी, महिला व पुरुष ८० पोलिस कर्मचारी, ८ जेसीबी घेऊन ही कारवाई करण्यात आली. मात्र इतक्या मोठ्या कारवाईला तहसीलदारांनी गैरहजेरी लावल्याने चर्चेला उधाण आहे होते.

# ड्रोन उडवण्यास मनाई
## पोलीस आयुक्तांचे आदेश जारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

**ठाणे, दि.15 ठाणे:** ठाणे आयुक्तालय क्षेत्रात अर्थात ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात ठाणे पोलिसांनी ड्रोन उडविण्यास तसेच इतर मानवरहित हवाई वस्तू उडविण्यास मनाईचे आदेश दिले आहे. भारत पाकिस्तान संघर्षानंतर मुंबई पोलिसांनी ड्रोन उडविण्यास बंदी घातल्यानंतर आता ठाणे पोलिसांनी देखील ड्रोन बंदीचे आदेश लागू केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पोलिसांकडून कारवाई केली जाणार आहे. शहरात काही समाजकंटकांकडून या उपकरणांचा वापर होण्याची शक्यता लक्षात घेता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच सार्वजनिक शांतता भंग होऊ नये यासाठी हे प्रतिबंधात्मक पाऊल उचलण्यात आले असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. ३ जून पर्यंत हे आदेश लागू असतील असेही स्पष्ट करण्यात आले.




भारत पाकिस्तान देशामध्ये संघर्ष निर्माण झाल्यानंतर राज्यातील पोलीस यंत्रणांना सर्तकतेचे आदेश देण्यात आले होते. मुंबई पोलिसांनी शहरात ड्रोन उडविण्यास बंदी घातली होती. त्यानंतर आता ठाणे पोलिसांनी देखील ड्रोन बंदीचे आदेश लागू केले आहेत. लग्न समारंभ किंवा कार्यक्रमात मोठ्याप्रमाणात ड्रोनचा वाप होतो. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी ही शहरे येतात. या भागात ठाणे पोलीस आयुक्त कार्यालयाने याबाबत आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही व्यक्तीला ड्रोन किंवा तत्सम उपकरणे उडवण्यास मनाई असेल. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ आणि इतर लागू कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन हा आदेश तातडीने लागू करण्यात आला आहे, असेही नमूद करण्यात आले आहे. ठाणे पोलीस विशेष शाखेचे उपायुक्त डॉ. श्रीकांत परोपकारी यांनी हे आदेश जारी केले आहेत.

# राज्य गुप्त वार्ता विभागाच्या सह आयुक्तपदी आयपीएस डॉ.रवींद्र शिसवे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आपल्या अंगभूत ,विश्वासार्हता, प्रामाणिकपणा, कामाप्रती निष्ठा, संयम, सातत्य, कुतूहल, सहानुभूती, दयाळूपणा, आणि नम्रता, आदी गुणवैशिष्ट्ये यामुळे प्रत्येक विभागात आपल्या कार्याचा'ठसा, उमटवणारे मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त डॉ रवींद्र शिसवे यांची राज्य गुप्त वार्ता(एस आय डी)विभागाचे सह आयुक्त म्हणून नियुक्ती झाली असून यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात या विभागात अभिनव बदल घडविण्याची संधी त्यांना मिळाली आहे, असे म्हटलं तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही.कल्याण तालुक्यातील 'आपटी,या छोट्याशा गावचे सुपूत्र डॉ रवींद्र शिसवे हे आयपीएस झाले, आणि त्यांनी अनेक जिल्हयाचे एसपी म्हणून काम केले, विशेष म्हणजे, पुणे शहरात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली, त्यामुळे त्यांना अनेक पुरस्कार, मिळाले, सत्कार, गौरव, सन्मान झाला,यानंतर ते मुंबई रेल्वे पोलीस आयुक्त म्हणून रुजू झाले, अंत्यत सवेदनशील असे



बदलापूर'बलात्कार, प्रकरणी उसळलेले अंदोलन, त्यांनी अंत्यत संयम, सातत्य, सहानुभूती, आणि बुध्दी कौशल्याने हाताळले, त्यामुळे तो 'माईणस्टोन, ठरला, यानंतर रेल्वे पोलीस आयुक्तालय अंतर्गत दृष्टिकोनात्मक बदल, प्रक्रियात्मक बदल,आणि पायाभूत सुविधा या त्रिसूत्री व्दारे आयुक्त डॉ रवींद्र शिसवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अभिनव योजनाव्दारे केलेले अंर्तबाह्य बदल भारतीय गुणवत्ता परिषदेला विशेष भावले आणि त्या जोरावर प्रत्येक मापदंडात राज्यातील अन्य आयुक्तालयांना मागे टाकत तिसरे स्थान पटकावले,याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ रवींद्र शिसवे यांचा सन्मान केला, असे आयपीएस डॉ शिसवे हे आता राज्य गुप्त वार्ता विभागाच्या सह आयुक्त पदी विराजमान होणार आहेत, त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राशी त्यांचा संबंध येणार आहे, राज्यातील प्रत्येक सीपी, एस पी यांना ते सूचना, मार्गदर्शन, सल्ला देणार आहेत, शिवाय रोज ते मुख्यमंत्री, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री, यांच्याशी संपर्क साधून असणार आहेत, राजकीय, संरक्षणविषयक, सांप्रदायिक, कामगार विषयक, सुरक्षेला असलेले धोके, तसेच कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम करणारे घटक, याविषयीची माहिती गोळा करणे, तिचा तुलनात्मक अभ्यास, विश्लेषण, आणि प्रसार यांच्याशी निगडित बाबी हाताळण्याचे काम हा विभाग करतो,अशा विभागाचे सह आयुक्त ते झाल्यामुळे या विभागासह संपूर्ण महाराष्ट्रात अभिनव बदल घडविण्याची संधी त्यांना मिळाली असून येथेही ते आपल्या कार्यशैलिचा ठसा उमटवतील यात शंका नाही.









# दहावीनंतरचे काही कोर्सेस

दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना काही महिन्यांचा मोकळा वेळ मिळतो. त्यांची इच्छा असेल तर ते या कालावधीत शॉर्ट टर्म कोर्स करू शकतात. यामुळे त्यांना अकरावीचा अभ्यासक्रम पूर्ण होण्यास मदत होईलच, शिवाय उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होण्यास देखील मदत होईल.

दहावीनंतरचा प्रत्येक निर्णय अतिशय काळजीपूर्वक घ्यावा. करिअरचा पाया इथूनच घातला जातो. दहावीनंतर अकरावी प्रवेशासाठी ही त्यांची निवड आणि भवितव्य लक्षात घेऊन विषयांची निवड करावी. साधारणपणे विद्यार्थी कला, विज्ञान आणि वाणिज्य यापैकी एका शाखेची निवड करतात.

**दहावीनंतर तुम्ही काय करू शकतो?**

दहावीनंतर विद्यार्थ्यांसमोर अनेक पर्याय असतात. आपण आपल्या वरिष्ठांशी, शिक्षकांशी, पालकांशी किंवा करिअर तज्ज्ञांशी बोलून यापैकी कोणतीही निवड करू शकता-1- विज्ञान, वाणिज्य किंवा कला शाखेचा 1- 12 वी अभ्यास,2- आयटीआय कोर्स ,3- पॉलिटेक्निक कोर्स ,4- डिप्लोमा कोर्स ,5- पॅरामेडिकल कोर्स ,
6- शॉर्ट टर्म कोर्स

दहावीबोर्डाच्या परीक्षेनंतर व्होकेशनल कोर्सेसमध्येही प्रवेश घेता येतो. व्होकेशनल कोर्सेसमध्ये जॉब फोकस्ड अभ्यासक्रम तयार केला जातो.

व्होकेशनल कोर्सेस : 1- इंटिरिअर डिझायनिंग कोर्स ,2- फायर अँड सेफ्टी ,3- सायबर लॉ ,4- ज्वेलरी डिझायनिंग कोर्स , 5- फॅशन डिझायनिंग कोर्स हे व्होकेशनल कोर्स करू शकता

दहावी पास होताच नोकरी करायची असेल तर खाली नमूद केलेल्या कोणत्याही कोर्समध्ये ॲडमिशन घेऊ शकता, जाणून घेऊया.

**दहावीनंतर करिअर कुठे करायचे?** : 1) IIT- दहावीनंतर पटकन नोकरी शोधण्यासाठी IIT हा उत्तम पर्याय आहे.



आयटीआयमध्ये इलेक्ट्रिशियन, वेल्डर, फिटर, मोटर मेकॅनिक, कॉम्प्युटर अशा अभ्यासक्रमांचा ठळकपणे समावेश आहे. त्यांचा कालावधी 6 महिन्यांपासून 2 वर्षांपर्यंत असतो.

**2) कॉम्प्युटर हार्डवेअर अँड नेटवर्किंग:** हे संगणकाचे युग आहे. कॉम्प्युटर हार्डवेअर आणि नेटवर्किंग कोर्सेसमध्ये कॉम्प्युटर रिपेअरिंग, हार्डवेअर आणि नेटवर्किंग इ. विषयी शिकवले जाते.

**3) अभियांत्रिकी पदविका:** या अभ्यासक्रमाला पॉलिटेक्निक डिप्लोमा असेही म्हणतात. अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम 3 वर्षांचा आहे. डिप्लोमा मिळाल्यानंतर तुम्ही नोकरीसाठीही अर्ज करू शकता. यामध्ये कॉम्प्युटर सायन्स, केमिकल, मेकॅनिकल, प्लास्टिक, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स असे विषय शिकवले जातात.

**4) नॉन इंजिनीअरिंग डिप्लोमा:** दहावीनंतर नॉन टेक्निकल डिप्लोमाचाही पर्याय आहे. हा पदविका देखील 3 वर्षांचा आहे. यामध्ये फॅशन डिझायनिंग, कमर्शियल आर्ट, टेक्सटाइल असे विषय शिकवले जातात.

**5) हॉटेल मॅनेजमेंट:** दहावीनंतर हॉटेल मॅनेजमेंटचा डिप्लोमा कोर्स करता येतो. या उद्योगात भविष्यात चांगल्या संधी आहेत.

दहावीनंतर सरकारी नोकरी मिळेल का? : दहावीनंतर सरकारी नोकरीचा पर्यायही दहावीनंतर आहे. 10 वी नंतर भारतीय लष्कर, रेल्वे, बीएसएफ इत्यादींमध्ये सरकारी नोकरीसाठी अर्ज करू शकता. सरकारी नोकऱ्यांमधील भरतीची माहिती वृत्तपत्रे व संकेतस्थळांवरील जाहिरातींच्या माध्यमातून उपलब्ध आहे.

# श्री. बाबासाहेब कवाद इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा १० वीचा निकाल शंभर टक्के

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**निघोज** : निघोज पठारवाडी येथील श्री. बाबासाहेब कवाद सेवाभावी संस्था संचलित इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा सलग १० वर्षे शेकडा १०० टक्के निकाल लागला असून शाळेने उज्वल निकालाची परंपरा कायम राखल्याबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी या सर्वांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.




शाळेत १० वी प्रथम ३ क्रमांकामध्ये मुलींचा समावेश असून या मध्ये अनुष्का संदीप गायकवाड हिने शेकडा ९४ .८० टक्के मिळवत प्रथम क्रमांक मिळवला , प्रांजल संदीप होले हिने शेकडा ९४ . ६० टक्के मिळवीत द्वितीय क्रमांक , तर कस्तुरी सोमेश्वर आढाव हिने शेकडा ९४ . ४० टक्के गुण मिळवीत तृतीय क्रमांक पटकावला आहे. त्याचप्रमाणे शेकडा ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणारे जवळपास १३ विद्यार्थी आहेत . शेकडा ८० टक्क्यां पेक्षा जास्त गुण मिळवणारे २१ विद्यार्थी आहेत व शेकडा ७० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवणारे जवळपास १८ विद्यार्थी आहेत. या प्रकारे गुणसंपादन केल्यामुळे यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करून संस्थापक दिवंगत बाबासाहेब कवाद यांनी शैक्षणिक संस्कृतीला चालना देण्याचे मोठे काम केले आहे .संस्थेचे अध्यक्ष शांताराम कळसकर, उपाध्यक्ष प्रकाश कवाद ,सचिव वसंतराव कवाद सर यांनी गेली अनेक वर्षापासून मोठ्या प्रमाणात योगदान देऊन शाळेचा नावलौकिक जिल्ह्यात वाढवला आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सचिव , शाळेचे सर्व विश्वस्त मंडळ, निघोज व परिसरातील विविध क्षेत्रात कार्यरत असणारे सर्व पदाधिकारी, व्यवस्थापन प्रतिनिधी ,प्राचार्य, व्यवस्थापक , शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी व पालक यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे प्राचार्य डायस सर व शिक्षकांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले आहे.

# के. रा. कोतकर विद्यालयाचा निकाल ९९.०३ टक्के

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून शहरातील उदय शिक्षण प्रसारक मंडळ संचालित के.रा. कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इ.१० वी चा निकाल ९९.०३ % लागला. शाळेने आपली उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.



शाळेच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले. यामध्ये प्रथम क्रमांक तनुश्री प्रल्हाद भोसले ९०.८०%, द्वितीय क्रमांक
कु. साक्षी दत्तात्रय डासाळ ८९.८०%, तृतीय क्रमांक कु. देविका वैभव खैर ८७.८०% हे क्रमवारीत आले आहेत. या परीक्षेसाठी एकूण १०३ विद्यार्थी बसले होते त्यापैकी १०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

शाळेत डिस्टिंक्शन मध्ये 19 विद्यार्थी असून फर्स्ट क्लास मध्ये 40 विद्यार्थी आहेत. सेकंड क्लास मध्ये 43 विद्यार्थी आहेत.

हे दैदीप्यमान यश म्हणजे विद्यार्थी, पालक व शिक्षक व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मुख्यध्यपिका संगीता प्रकाश पाखले यांनी विदयार्थ्यांसाठी वर्षभर आखलेल्या नियोजनाचा व विद्यार्थ्यांच्या मागील बारा वर्षांच्या मेहनतीचा परिपाक आहे. शाळेतील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा भक्कम पाया रचला व विद्यार्थ्यांनी त्यावर कळस चढवला. शिक्षक व विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांना उत्तुंग यशासाठी वाटचाल करण्यास संस्थेचे अध्यक्ष आशुतोष रामदास येवले व इतर सर्व संचालकांनी स्वतः जातीने लक्ष घालून विविध शैक्षणिक उपक्रम राबवून मुलांना प्रोत्साहन दिले.

# टॅक्सी/ऑटोरिक्षा भाडे मीटरचे रिकॅलीब्रेशन करण्याकरिता मुदतवाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि.23 जानेवारी 2025 रोजीच्या बैठकीमध्ये मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सी.एन.जी.) व ऑटोरिक्षा (सी.एन.जी.) यांच्या भाडेदर वाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. सुधारित भाडेवाढीप्रमाणे अद्यापही मीटर टॅक्सी व ऑटोरिक्षा वाहनांचे भाडेमीटर रिकॅलीब्रेशनचे काम



बाकी असल्याने टॅक्सी/ऑटोरिक्षा भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन करण्याकरिता दि.31 मे 2025 पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि.30 एप्रिल 2025 रोजीच्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

मुदतवाढ समाप्ती नंतरच्या प्रत्येक दिवसाच्या विलंबासाठी विभागीय दंडात्मक शुल्क प्रतिदिन रुपये 50/- आकारण्याचा निर्णय दि.01 जून 2025 पासून लागू होईल, याची सर्व मीटर टॅक्सी व ऑटोरिक्षा चालकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन ठाणे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी केले आहे.

# कोळसेवाडी पोलिसांनी उघडकीस आणला मोटारसायकल चोरीचा गुन्हा

## मोटार सायकलसह चोरास केली अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलीसांनी मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आणला असून मोटार सायकलसह चोराला अटक केली आहे.

कोळसेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडणारे वाहन चोरी गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे यांच्या सुचनेप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी




कोळशेवाडी पो.स्टे. मध्ये दाखल गुन्हयातील चोरीस गेलेल्या टिव्हीएस कंपनीची एन्ट्रॉक स्कूटी व अज्ञात आरोपीचा तपास करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहीती प्राप्त करून रेकॉर्डवरील आरोपी पियुष मधूकर जाधव, वय २० वर्षे, रा. काटेमानीवली नाका, कल्याण पुर्व याला मंगळवारी लोकग्राम सर्कल, कल्याण पुर्व येथे ताब्यात घेवून त्याच्याकडून चोरी केलेली ८० हजार रू. किमंतीची टिव्हीएस कंपनीची एन्ट्रॉक स्कूटी हस्तगत करण्यात आली आहे.

त्याला गुन्हयाच्या तपासाकामी ताब्यात घेवून अटक केली आहे. हि कारवाई पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली कोळसेवाडी पोलीस ठाणेचे वपोनिरी. गणेश न्हायदे, सपोनिरी. दर्शन पाटील, पोहवा मिलींद बोरसे, राजेश कापडी, भागवत सौंदाणे, भगवान सांगळे, विलास जरग, नरेश दळवी, पो.शि. दिलीप सोनावळे, प्रदिप गिते यांनी केली आहे.

# आंबिवलीत अल्पवयीन गतीमंद मुलीवर लैंगिक अत्याचार

## टिटवाळा पोलिसांनी आरोपीला केली अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण तालुका ग्रामीण पोलिस स्टेशनच्या हद्दीत येणा-या आंबिवली परिसरात एका अल्पवयीन गतीमंद मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. या घटनेने संपुर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकाकडून संताप व्यक्त केला जात आहे. या गुन्ह्यातील आरोपीला पोलिसांनी अटक केली असुन पोलीस पुढील तपास चालु आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार बुधवारी रात्री आठच्या सुमारास आपल्या घरा शेजारील परिसरात फिरत असताना एका अल्पवयीन गतीमंद मुलीला त्याच परिसरातील एका नराधमाने फुस लावुन बाजुला असलेल्या एका खोलीत घेउन गेला आणि आतुन दरवाजाची कडी लावली. नराधमाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असुन त्याच्यावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले असता आरोपींला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याबाबतचा अधिक तपास टिटवाळा पोलीस करीत आहेत.

# कंटेनरच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : ठाण्याच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या कंटेनरने धडक दिल्याने एका पादचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. मुंबई-नाशिक महामार्गावर दिवा गावच्या हद्दीत बुधवारी पहाटे हा अपघात झाला होता. याप्रकरणी नारपोली पोलिस ठाण्यात ट्रकचालकाविरोधात गुन्हा दाखल आहे. मुंबई-नाशिक महामार्गावरील हायवे दिवे हद्दीतून समाधान तोंडे (२७) हा पहाटे ४ वाजता पायी जात होता. ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरचालकाने मानकोली ब्रिजजवळ समाधानला जोरात धडक दिली. या अपघातात ट्रकचा समोरील चाक समाधानच्या तोंडावरून गेल्याने जागीच मृत्यू झाला. दरम्यान, नारपोली पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत उत्तरीय तपासणीसाठी मुतदेह इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात पाठवला आहे, तर अपघातानंतर ट्रकचालक फरार झाला आहे. त्यामुळे समाधान याची बहीण सविता तोंडे (२१) यांच्या फिर्यादीवरून ट्रकचालकावर नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# गीतासार



## अध्याय ११ विश्वरूपदर्शनयोगः

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता । यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥ ११-१२ ॥

आकाशात हजार सूर्य एकदम उगवले असता जो प्रकाश पडेल, तोही त्या विश्वरूप परमात्म्याच्या प्रकाशाइतका कदाचितच होईल म्हणजे होणार नाही. ॥ ११-१२ ॥

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा । अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा ॥ ११-१३ ॥

पांडवाने (पांडुपुत्र अर्जुनाने) त्यावेळी अनेक प्रकारांत विभागलेले संपूर्ण जग देवाधिदेव भगवान श्रीकृष्णांच्या त्या शरीरात एकत्रित असलेले पाहिले. ॥ ११-१३ ॥

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनञ्जयः । प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत ॥ ११-१४ ॥

त्यानंतर तो आश्चर्यचकित झालेला व अंगावर रोमांच उभे राहिलेला धनंजय (अर्थात अर्जुन), प्रकाशमय विश्वरूप परमात्म्याला श्रद्धाभक्तीसह मस्तकाने प्रणाम करून हात जोडून म्हणाला ॥ ११-१४ ॥

अर्जुन उवाच पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् । ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥ ११-१५ ॥

अर्जुन म्हणाला, हे देवा, मी आपल्या दिव्य देहात संपूर्ण देवांना तसेच अनेक भूतांच्या समुदायांना, कमळाच्या आसनावर विराजमान झालेल्या ब्रह्मदेवांना, शंकरांना, सर्व ऋषींना तसेच दिव्य सर्पांना पाहात आहे. ॥ ११-१५ ॥

# आरोग्य

## मखाना खाण्याचे फायदे



**वजन कमी करण्यास मदत** – मखामध्ये कॅलरीज कमी असतात, ज्यामुळे वजन कमी करण्यासाठी फायदेशीर ठरते. मखाना खाल्ल्याने पोट भरल्यासारखे वाटते आणि जास्त खाण्याची इच्छा होत नाही.

**रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवते** – मखामध्ये ग्लाइसेमिक इंडेक्स कमी असतो, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते.

**हृदयविकार कमी करण्यास मदत** – मखामध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असतात, ज्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहतो आणि हृदयविकार कमी होण्यास मदत होते.

**सांधेदुखी कमी करते** – मखामध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे सांधेदुखी कमी करण्यास मदत करतात.

**पचन सुधारते** – मखाना खाल्ल्याने पचन क्रिया सुधारते, आणि पोटदुखी, गॅस आणि अपचन यांसारख्या समस्या कमी होतात.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवते** – मखामध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे रोगप्रतिकारशक्ती वाढवतात.

**त्वचेसाठी फायदेशीर** – मखाना खाल्ल्याने त्वचा चमकदार होते आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी होतात, असे टाइम्स ऑफ इंडियावर नमूद केले आहे.

**मजबूत हाडं आणि स्नायू** – मखामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि प्रथिने असतात, जे हाडं आणि स्नायू मजबूत करण्यास मदत करतात.

**तणाव कमी करते** – मखाना खाल्ल्याने तणाव कमी होतो आणि शांतता अनुभवते.

# ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत गट क व गट ड संवर्गातील बदली प्रक्रिया यशस्वीरीत्या पार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत गट-क (वर्ग 3) व गट-ड (वर्ग 4) संवर्गातील कर्मचाऱ्यांची जिल्हांतर्गत प्रशासकीय, विनंती व आपसी बदली प्रक्रिया या प्रक्रियेत कर्मचाऱ्यांच्या सहभागा बरोबरच पारदर्शक निर्णय प्रक्रियेवर भर देण्यात आला. समुपदेशनाच्या माध्यमातून दि. १५ मे, २०२५ रोजी, बी. जे. हायस्कुल येथे यशस्वीरित्या पार पडली.

मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांच्या मार्गदर्शना खाली आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांच्या उपस्थितीत बी. जे. हायस्कूल सभागृह, ठाणे येथे बदली प्रक्रिया पार पडली. बदली प्रक्रियेची संपूर्ण कार्यवाही पारदर्शकतेच्या निकषानुसार राबवण्यात आली असून, सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्स फेसबुक व यूट्यूबवर Live Streaming द्वारे नागरिक व कर्मचाऱ्यांसाठी खुली करण्यात आली होती.

बदली प्रक्रिया सात टप्प्यांमध्ये विभागली गेली होती. यात आदिवासी व बिगर आदिवासी भागातील प्रशासकीय प्राधान्य, सेवा कालावधी व वास्तव्य जेष्ठतेनुसार समुपदेशन करण्यात आले. त्यानंतर विनंती व आपसी बदल्याही समुपदेशनाद्वारे पूर्ण करण्यात आल्या.

आज, दि. १५ मे रोजी ग्रामीण पाणी पुरवठा, लघुपाटबंधारे, महिला व बालकल्याण, पशुसंवर्धन, अर्थ, सामान्य प्रशासन व प्राथमिक शिक्षण विभागांतील बदल्या पार पडल्या, तर दि. १६ मे रोजी ग्रामपंचायत, आरोग्य, कृषी व बांधकाम विभागांतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येणार आहे.


अर्थ विभाग, लघुपाट बंधारे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील प्रशासकिय व विनंती बदलीस पात्र कर्मचारी नसल्याने त्या विभागातील बदली करण्यात आली नाही. महिला व बालकल्याण विभागातील प्रशासकीय ०१, विनंती ०० बदल्या करण्यात आल्या. पशुसंवर्धन विभागातील प्रशासकीय ०६, विनंती ०२ बदल्या करण्यात आल्या., सामान्य प्रशासन विभागातील वरिष्ठ सहाय्यक प्रशासकीय ०३, कनिष्ठ सहाय्यक प्रशासकीय ०७, वरिष्ठ सहाय्यक विनंती ०२, कनिष्ठ सहाय्यक विनंती ०१, कनिष्ठ सहाय्यक आपसी ०३ (६) बदल्या करण्यात आल्या व प्राथमिक शिक्षण विभागांतील प्रशासकीय ००, विनंती ०१ बदल्या करण्यात आल्या आहेत.

जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने सर्व संबंधित विभाग प्रमुख, अधिकारी, तांत्रिक पथक व कर्मचारी यांचे योग्य समन्वय व सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. बदल्यांनंतर संबंधित कर्मचाऱ्यांनी नवीन कार्यस्थळी तत्काळ रुजू व्हावे, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# पुना लिंक रोडवरील अपघात टाळण्यासाठी १०० फुटी रस्ता सुरु करा : मनसेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील पुना लिंक रोड येते अवजड वाहनांचे ब्रेक फेल होऊन अपघात होण्याच्या घटना वाढल्या असून या रोडवर होणारे अपघात टाळण्यासाठी 100 फुटी रस्ता सुरु करण्याची मागणी मनसेने केली असून याबाबत मनसेचे उपशहर अध्यक्ष योगेश गव्हाणे यांनी केडीएमसी आयुक्तांना पत्र दिले आहे.






कल्याण पूर्व परिसरातील १०० फुटी रोड हा कल्याण पूर्व परिसरातील पुना लिंक रोड वरील वाहतूक कमी करण्यासाठी एक महत्वाचा पर्याय आहे. परंतु हा रस्ता गेले कित्येक वर्ष प्रलंबित आहे. या रस्त्याचे बहुतांश काम हे पूर्ण झाले आहे. १०० फुटी रस्ता पूर्ण करून घेतला तर कल्याण पूर्व मधील गेले काही महिने सातत्याने मोठ्या गाडीचे अपघात होत आहेत, सुदैवाने शाळांना सुट्टी असल्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी होत नाहीये. १०० फुटी रस्ता पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुला झाल्यास पुनालिंक रस्त्यावरील मोठ्या जड वाहनांची वाहतूक १०० फुटी रस्तावर वळवून होणारे अपघात कमी होऊ शकतात. तरी १०० फुटी रस्ता हा पुनालींक रोड रस्त्याला रहदारीस पर्याय म्हणून होऊ शकतो. कल्याण पूर्व मधील पुना लिंक रोड वरील होणारे जीवघेणे अपघात कमी होतील. त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी मनसेचे उपशहर अध्यक्ष योगेश गव्हाणे यांनी केली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# नवी मुंबईत चाललंय तरी काय ?

## इमारतींना बजावलेल्या नोटीसीवरुन राजकीय कलगीतुरा



### दोन इमारतींना बजावलेल्या नोटिसांना नगरविकास विभागाकडून स्थगितीची चर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** - नवी मुंबई शहरातील वाशी विभागातील राजकीय वादाचा केंद्रबिंदू ठरलेल्या 'अलबेला' आणि 'नैवेद्य' या दोन इमारतींना पालिकेने बजावलेल्या नोटीशींना नगरविकास विभागाने स्थगिती दिल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. याबाबत पालिकेकडून मात्र कमालीची गुप्तता पाळण्यात येत आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी नुकत्याच झालेल्या पालिकेच्या अधिकाऱ्यांसोबतच्या मंत्रालयातील बैठकीत ऐरोली विभागातील कांदळवनाच्या जागेवरील अतिक्रमण तसेच वाशी येथील दोन इमारतींमध्ये भोगवटा प्रमाणपत्रावरुन अधिकाऱ्यांची कानउघडणी केली होती. ऐरोली विभागात नवी मुंबई शहरातील वाशी विभागातील 'अलबेला' व 'नैवेद्य' या इमारतींना पालिकेने नोटीसा बजावल्या आहेत. या दोन्ही इमारतींवरून चांगलाच राजकीय वादंग सुरू झाला आहे. शिवसेना पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष किशोर पाटकर यांचा सहभाग असलेली अलबेला तसेच नुकतेच काँग्रेसमधून शिवसेनेत आलेले अविनाश लाड यांचा सहभाग असलेली नैवेद्य या इमारतींवरुन राजकीय कुरघोडी सुरू आहेत.

> वाशी विभागातील अलबेला व नैवेद्य या इमारतींना अनधिकृत वापराबाबतची नोटीस पालिकेने ३ मार्चलाच बजावलेली आहे. परंतु या नोटीसींना नगरविकास विभागाकडून स्थगिती दिली वा नाही याबाबत कल्पना नाही.
> - अलका महापूरकर, सहाय्यक आयुक्त, वाशी विभाग

> मंत्री गणेश नाईक यांनी दबाव टाकून इमारतींना नोटीस काढायला लावल्या आहेत. आम्ही नियमानुसार इमारतीची बांधकाम परवानगी घेतली आहे. तसेच भोगवटा प्रमाणपत्राबाबत फाईल संबंधीत विभागाकडे दिली आहे. त्यामुळे नाईक यांच्याकडून जाणीवपूर्वक आमच्यावर राजकीय सूड उगवण्याचा प्रयत्न होत आहे. त्याला आम्ही घाबरत नाही.
> - किशोर पाटकर, जिल्हाध्यक्ष, शिवसेना, नवी मुंबई

वनमंत्री गणेश नाईक यांनी नुकत्याच झालेल्या पालिकेच्या अधिकाऱ्यांसोबतच्या मंत्रालयातील बैठकीत ऐरोली विभागातील कांदळवनाच्या जागेवरील अतिक्रमण तसेच वाशी येथील दोन इमारतींमध्ये भोगवटा प्रमाणपत्रावरुन अधिकाऱ्यांची कानउघडणी केली होती. ऐरोली विभागात कांदळवनाच्या जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामावरुन तोडक कारवाईही करण्यात आली होती. तर वाशी येथील अलबेला व नैवेद्य या इमारतीच्या भोगवटा प्रमाणपत्रावरुन पालिकेने नोटीस बजावल्या आहेत. त्यामुळे शहरात नाईक व शिंदे यांच्या शह कटशहाच्या राजकारणाचा आणखी एक नाट्यमय अंक या इमारतींच्या प्रश्नाच्या निमित्ताने पाहायला मिळत आहे.

ठाण्यात नाईकांनी घेतलेला जनता दरबार यावरुनही जोरदार चर्चा झाली होती. त्यामुळे उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री असलेल्या एकनाथ शिंदे याच्या या वाशीतील दोन शिलेदारांना बजावलेल्या नोटीसीवरुन आणखी राजकीय कलगीतुरा रंगणार असल्याचे चित्र आहे. आगामी नवी मुंबई महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आतापासूनच राजकीय वर्चस्वाची लढाई नवी मुंबईत पाहायला मिळत आहे. वाशी येथील अलबेला तसेच नैवेद्य या इमारतींना पालिकेने सीसी अर्थात बांधकाम परवानगी दिली आहे. परंतु या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिले नसल्याने पालिकेने नोटीसा बजावल्या आहेत. याबाबत शिवसेनेचे अविनाश लाड यांना विचारणा केली असता नगरविकास विभागाने पालिकेने दिलेल्या नोटीसीला स्थगितीबाबत अधिक माहिती घेतो सांगितले. नोटीशींना स्थगितीबाबत पालिकेकडून मात्र कमालीची गुप्तता बाळगण्यात आली आहे.

ठाण्यात नाईकांनी घेतलेला जनता दरबार यावरुनही जोरदार चर्चा झाली होती. त्यामुळे उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री असलेल्या एकनाथ शिंदे याच्या या वाशीतील दोन शिलेदारांना बजावलेल्या नोटीसीवरुन आणखी राजकीय कलगीतुरा रंगणार असल्याचे चित्र आहे.

आगामी नवी मुंबई महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आतापासूनच राजकीय वर्चस्वाची लढाई नवी मुंबईत पाहायला मिळत आहे. वाशी येथील अलबेला तसेच नैवेद्य या इमारतींना पालिकेने सीसी अर्थात बांधकाम परवानगी दिली आहे. परंतु या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिले नसल्याने पालिकेने नोटीसा बजावल्या आहेत. याबाबत शिवसेनेचे अविनाश लाड यांना विचारणा केली असता नगरविकास विभागाने पालिकेने दिलेल्या नोटीसीला स्थगितीबाबत अधिक माहिती घेतो सांगितले. नोटीशींना स्थगितीबाबत पालिकेकडून मात्र कमालीची गुप्तता बाळगण्यात आली आहे.



# कासार्डी नदी संवर्धनासाठी पनवेल महापालिकेला हिरवा कंदील

**कासार्डी नदीच्या संवर्धनासाठी 'कासार्डी नदी पुनरूज्जीवन प्रकल्प' राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाची पाहणी पनवेल महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी केली. कासार्डी नदी संवर्धनासाठी रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना केल्या असून त्यानुसार विविध कंपन्यांकडून नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर देखरेख करून त्याच स्क्रीनिंग करण्याविषयीचे निर्देश संबंधित आस्थापनांना पनवेल महापालिकेने दिले आहेत.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** तळोजा औद्योगिक परिसर आणि गावांना जोडणाऱ्या कासार्डी नदीच्या संवर्धनासाठी रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा असलेल्या १७ कोटी ४४ लाख २२ हजार रुपयांचा निधी पनवेल महापालिकेकडे पाच दिवसांपूर्वी वर्ग

> **रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडून १७ कोटी ४४ लाख २२ हजार रुपयांचा निधी महापालिकेला वर्ग**

करण्यात आला. हा निधी वर्ग करण्याचे पत्र हाती लागताच पनवेल महापालिकेच्या आयुक्तांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांशी याविषयी चर्चा केली. लवकरच या नदीच्या संवर्धनासाठी नेमके काय करता येईल याची आखणी पनवेल महापालिकेत सुरू झाली.

पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी कासार्डी नदी संवर्धनाच्या महत्त्वाच्या विषयाची जबाबदारी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांना दिली आहे. कासार्डी नदी संवर्धनाचा विषय शेकापचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी सनदशीर मार्गाने लावून धरला आहे. हरित लवादासमोर हा विषय मांडल्यावर मुंबई येथील भारतीय प्रौद्योगिक संस्थान (आयआयटी) यांच्या तज्ज्ञांनी कासार्डी नदीचे संवर्धन करण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार केला. यासाठी आय.आय.टीला ३७ लाख ७६ हजार रुपये देण्यात आले. याच अहवालामुळे कारखान्यांच्या दूषित व घातक रसायनांमुळे नदीचा रासायनिक नाला झाल्याचे उजेडात आले. हरित लवाद आणि सर्वोच्च न्यायालयात ही वस्तूस्थिती समोर आल्यावर कारखानदारांकडून १५ कोटी रुपये दंडाचे रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा करण्यात आले. हीच रक्कम व्याजासह १७ कोटींवर पोहचली आहे. ही रक्कम नदी संवर्धनासाठीच वापरावी अशा सूचना रायगड जिल्हाधिका-यांनी ठळकपणे पनवेल पालिकेच्या पत्रात केल्या आहेत.

# विमान सदृश ड्रोन आढळल्याने शहापूरातील फुगाळे गावात खळबळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शहापूर तालुक्यातील कसारा जवळील सह्याद्री डोंगर रांगाच्या भागात फुगाळे गाव हद्दीत गुरुवारी दुपारी जंगलात रानमेवा खाण्यासाठी गेलेल्या मुलांना जमिनीवर ड्रोन आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. विमानासारख्या दिसणाऱ्या या ड्रोनची माहिती ग्रामस्थांनी तातडीने कसारा पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन या ड्रोन ताब्यात घेऊन त्याची तपासणी केली. दरम्यान हा ड्रोन जलसंपदा विभागाचा असल्याची माहिती पोलीस तपासात पुढे येताच नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला.

पेहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने दहशतवाद्यांचे अड्डे उध्वस्त करण्यासाठी पाकिस्तानवर हवाई हल्ला चढविला. तसेच, पाकिस्तानकडून अनेक ड्रोन भारताच्या दिशेने सोडण्यात आले होते. हे ड्रोन भारतीय हवाई दलाने हवेत नष्ट केले. ही सर्व परिस्थिती अद्याप ताजी असतानाच्या काळात कसारा घाट परिसरातील फुगाळे गाव हद्दीत सह्याद्री डोंगर रांगांच्या जंगलात जमिनीवर सुस्थितीत अवस्थेतील ड्रोन आढळल्याने सर्वत्र खळबळ उडाली.

फुगाळे गावातील शाळकरी मुले गुरुवारी दुपारी शाळांना सुट्टी लागली असल्याने गाव परिसरातील जंगलामध्ये करवंद, आंबे आणि इतर रानमेवा खाण्यासाठी फिरत होती. जंगलात फिरत असताना दूरवरून एक विमानासारखी प्रतिकृती जंगलात पडली असल्याचे त्यांना दिसले. सुरूवातीला ही मुले ही विमान सदृश्य वस्तू पाहून घाबरली. त्यांनी धाडस करत या प्रतिकृतीच्या जवळ जाऊन पाहणी केली. त्यांनी बारकाईने निरीक्षण केले तर हा ड्रोन असून तो निकामी होऊन पडला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. मुलांनी ही माहिती तात्काळ गावात येऊन ग्रामस्थांना दिली. ग्रामस्थांनी ही माहिती कसारा पोलिसांना दिली.

कसारा पोलिसांनी सुरक्षिततेचा विचार करून तातडीने फुगाळे गावातील जंगलात धाव घेतली. या साधनाची बारकाईने तपासणी केली. हा ड्रोन असल्याचे दिसून आले. या ड्रोनवर स्ट्रीव्हर मिनी कंपनीचे नाव लिहिण्यात आले आहे. ड्रोन जमिनीवर पडला असला तरी त्याची कोणतीही मोडतोड झाली नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. तसेच हा ड्रोन जलसंपदा विभागाचा असून तो वैतरणा विभागात सर्वेक्षण कामासाठी वापरण्यात येत होता. त्यावेळी तांत्रिक बिघाडामुळे तो खाली पडला अशी बाब पोलिसांच्या तपासात उघड झाली आहे.



> जलसंपदा विभागाकडून नदी पात्राचे सर्वेक्षण सुरु होते. तांत्रिक बिघाडामुळे तो ड्रोन पडला असावा. नागरिकांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नाही.
> - मिलिंद शिंदे, पोलीस उपअधीक्षक, शहापूर, ठाणे ग्रामीण

# पालघरातील दगडखाणीत बेकायदा स्फोट ?

## मान्यता नसलेल्या जिलेटिन कांड्यांचा सर्रास वापर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर : पालघर जिल्ह्यात दगड व खडी उत्पादनासाठी दगडखाणीत घडवण्यात येणाऱ्या स्फोटासाठी गुजरातमधील जिलेटिन कांड्यांचा बेकायदा वापर करण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. याकडे पोलीस, विस्फोटके विभाग, खनिकर्म विभाग तसेच महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने अशा जिलेट कांड्यांचा गैरवापर विघातक कारवायांसाठी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



जिल्ह्यात राष्ट्रीय प्रकल्पांसह मोठ्या प्रमाणात गृहसंकुले विकसित होत आहेत. त्याशिवाय रस्ते, गटारे, संरक्षण भिंतीची उभारणी होत असून दगड, कपची व विविध आकाराच्या खडीला सध्या चांगला दर मिळत आहे. बोईसरच्या पूर्वेला असणाऱ्या नागझरी, लालोंडे, गुंदले, किराट, निहे आदी भागांमध्ये ३५-४० खडी क्रशर आहेत. क्रशर मालक खासगी मालकीच्या जागा अथवा शासकीय खनिपट्टे भाडेतत्त्वावर घेऊन त्याच्यामध्ये दगड उत्खनन करत असतात.

दगड खदानीमध्ये जिलेटिन कांड्यांच्या व डिटोनिएटरच्या मदतीने शक्तिशाली स्फोट घडवून त्यामधून दगड उत्खनन केले जाते. या दगडापासून वेगवेगळ्या क्रशरमध्ये खडी उत्पादित केली जाते. दगड खदानीमध्ये स्फोट घडवून आणण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते. जिलेटिन कांड्यांचा (२०० कांड्यांचे सुमारे २५ किलोचे मॅक्झिनद्वारे) साठा विकत घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आरंभी ना हरकत दाखला दिला जातो. त्याआधारे परवानाधारक विक्रेत्यांकडून येथील खदान मालक जिलेटिन कांड्या व डिटोनिएटर विकत घेतात. ही सर्व खरेदी-विक्रीची प्रक्रिया ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने केली जाते.

आवक होणाऱ्या कांडीपासून वापरल्या जाणाऱ्या कांड्यांचा तपशील ठेवणे व अपलोड करणे त्यांनी अपेक्षित असते. प्रत्येक खदान मालकाला दिलेल्या मासिक जिलेटिन कांड्या हाताळणीच्या परवानगीनुसार जिलेटिनची हाताळणी करावी लागते. मात्र अधिकृत पद्धतीने मिळवलेल्या जिलेटिन व डिटोनिएटरचा वापर किचकट असल्याने गैरमार्गाने येणाऱ्या जिलेटिनचा वापर करण्यावर तर मान्यतेपेक्षा अधिक प्रमाणात स्फोट घडवून आणण्याला येथील खदान मालक प्राधान्य देत असल्याचे दिसून येते.

गुजरात येथून छुप्यामार्गाने जिलेटिन कांड्या व डिटोनिएटर पिकअप व्हॅनमधून आणल्या जात असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांकडून देण्यात येते. सद्यःस्थितीत भारत-पाकिस्तानचे तणावपूर्ण संबंध, जिल्ह्यात बेकायदा राहणारे बांगलादेशी कुटुंब तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी माहिती नसलेल्या नागरिक पाहता नागरी वस्तीमध्ये घातपात वा स्फोट घडवण्याची शक्यता वर्तवण्यात येते.

# मीरा भाईंदर पोलिसांना मिळणार सतरा टोईंग वाहने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** 'नो पार्किंग' क्षेत्रात उभ्या राहणाऱ्या वाहनांवर कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी पोलीस आयुक्तालयाच्या ताफ्यात लवकरच १७ नवीन टोईंग वाहने दाखल होणार आहेत. यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अधिक कठोरपणे कारवाई करता येणार असून, शहरातील वाहतूक कोंडीची समस्या काही प्रमाणात सुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिरा भाईंदर आणि वसई-विरार शहरांमध्ये वाहनांची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. परिणामी, रस्त्यांवर ताण निर्माण होत असून अरुंद रस्त्यांवर वाहन उभी करण्याच्या प्रवृत्तीमुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस आयुक्तालयामार्फत 'नो पार्किंग' क्षेत्र निश्चित करण्यात आली आहेत. या ठिकाणी वाहन उभी केल्यास ती टोईंग करून पोलिसांच्या गोदामात नेली जातात आणि संबंधित वाहनचालकावर दंडात्मक कारवाई केली जाते.

मात्र, मागील काही महिन्यांपासून या कारवाईचा वेग मंदावल्याच्या तक्रारी होत्या. त्यामुळे या प्रक्रियेला गती देण्यासाठी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या सूचनेनुसार टोईंग वाहनांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने १७ अतिरिक्त टोईंग वाहनांचा प्रस्ताव वाहतूक विभागाने तयार केला होता, त्याला आता अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. ही वाहने लवकरच प्रत्यक्ष रस्त्यांवर कारवाई करताना दिसणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी दिली आहे.

मिरा भाईंदर व वसई विरार पोलीस आयुक्तालयामार्फत नो पार्किंग क्षेत्रात उभी असलेली वाहने टोईंग करून पोलिस गोदामात नेली जातात. यावेळी संबंधित वाहनचालकाकडून वाहतूक दंडासोबतच २०० रुपयांचे टोईंग शुल्कही आकारले जाते. नव्या टोईंग वाहनांची संख्या वाढवण्यासाठी आयुक्तालयाने निविदा प्रक्रिया सुरू केली होती. सध्या कंत्राटदार निवडीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच ती पूर्ण होईल, अशी माहिती पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी दिली आहे.

# अद्ययावतीकरणासाठी शासनाचे संकेतस्थळ दोन दिवस बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. १४ :** महाराष्ट्र राज्य शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.maharashtra.gov.in व शासन निर्णय संकेतस्थळ www.gr.maharashtra.gov.in हे पोर्टल नियमित देखभालीबरोबरच तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत करण्यात येणार आहे, त्यासाठी दि. १५ ते १६ मे २०२५ असे दोन दिवस या पोर्टलची सेवा बंद राहील, असे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने कळविले आहे. दि.१५ ते १६ मे या कालावधीत महाराष्ट्र राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर कोणतीही सेवा उपलब्ध राहणार नाही याची राज्यातील सर्वसामान्य नागरिक आणि शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी, असेही माहिती तंत्रज्ञान महामंडळाने प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# दहावीत टॉपवर आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान

## साईबाबा इंटरप्रायजेस, दर्शना इंटरप्रायजेस आणि पत्रकार संजय कांबळे यांचा संयुक्त उपक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण (प्रतिनिधी) :** अंत्यत गरीब परिस्थितीत जिद्द, चिकाटी, कष्ट करण्याची महत्वकांक्षा यांच्या जोरावर कल्याण ग्रामीण भागातून रायते विभाग हायस्कूल रायते या शाळेतून तब्बल८८टक्के गुण मिळवून पहिली आलेल्या कु अस्मिता विलास घारे, तसेच कु दिव्या संजय घारे, कु कनिका, शंशिकांत शिसवे यांच्या सह हिंमाशू संजय कांबळे, अमन बिपिन शर्मा इत्यादी यशस्वी विद्यार्थ्यांचा साईबाबा इंटरप्रायजेस, दर्शना इंटरप्रायजेस आणि पत्रकार संजय कांबळे यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरप्रायजेस चे राकेशशेठ मोरे यांच्या हस्ते शाल ,श्रीफळ,भेटवस्तू आणि



गुलाबपुष्प देऊन पेढे भरवून सन्मान करण्यात आला, कल्याण तालुक्यातील मांजर्ली या छोट्याशा गावातील विलास बारकू घारे हे कपड्यांच्या दुकानात काम करणारे शेतमजूर आहेत, संजय घारे हे कष्टकरी शेतमजूर आहेत, तर शंशिकांत शिसवे हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ(एमआयडीसी)मध्ये कार्यरत आहेत, बिपिन शर्मा हे सुतारकाम करतात, आणि अखेरचे पत्रकार संजय कांबळे हे परिसरातील नामांकित पत्रकार आहेत, या सर्वांच्या मुलांनी माध्यमिक परीक्षेत उज्ज्वल असे यश प्राप्त केले आहे. त्यामुळे त्यांच्या पाठिवर कौतुकाची थाप पडावी म्हणून साईबाबा इंटरप्रायजेस, दर्शना इंटरप्रायजेस व आणि पत्रकार संजय कांबळे हे नेहमीच आघाडीवर असतात. आजही या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव रोकेश शेठ मोरे यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी या विद्यार्थ्यांना विचारले असता आपल्या यशामध्ये आपले गुरुजन, आईवडील यांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी संजय घारे, शंशिकांत शिसवे, जिल्हा परिषदेच्या वनिता कांबळे,पत्रकार संजय कांबळे, आणि साईबाबा, दर्शना इंटरप्रायजेस चे राकेशशेठ मोरे उपस्थित होते.



## पडघा येथील एक्सपर्ट क्लासच्या विद्यार्थ्यांचे दहावी परिक्षेत घवघवीत यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील एक्सपर्ट क्लासेसमधील विद्यार्थ्यांनी एस.एस.सी.परिक्षेत यंदाही घवघवीत यश संपादन केल्याने विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

क्लासचालक विनीत काशीनाथ शेलार व महेंद्र नामदेव चोरघे यांनी क्लासमधील विद्यार्थ्यांच्या एस. एस. सी. परिक्षेसाठी केलेले योग्य नियोजन व मार्गदर्शनामुळे आर. के. पालवी विद्यामंदिर आणी ज्यु. कॉलेज मधील श्लोक दळवी याने ९३.८० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम, भावीक शेंडे याने ९२.८० टक्के गुण मिळवून व्दितीय क्रमांक तर गौरव फर्डे ह्याने ९३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला तर याच शाळेतील वेदीका ठाणगे, रिद्धी विशे, वेदीका शेलार, यांना ९२ टक्के तसेच विनीत पितांबरे यास ९१ टक्के गुण मिळाले.तर बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूल व ज्युनियर कॉलेजमधील हर्ष पाटील याने ८९ टक्के गुण मिळवून शाळेत व्दितीय क्रमांक तर साहील भोईर यांनी ८८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला यावर्षी लागलेल्या एस. एस. सी. निकालात एक्सपर्ट क्लासमधील ७ विद्यार्थ्यांनी ९० टक्के, १५ विद्यार्थ्यांनी ८० टक्के, १८ विद्यार्थी हे ७० टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले.त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी योग्य नियोजन व मार्गदर्शन करणाऱ्या एक्सपर्ट क्लासेसचे व सर्व गुणवंत, उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## डोंबिवली महानगरपालिका सेवक वर्ग सहकारी पतपेढीच्या अध्यक्षपदी विजय भोईर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली महानगरपालिका सेवक वर्ग सहकारी पतपेठी मर्यादित संचालक मंडळ निवडणूक 2025-30 च्या निवडणुकीत एकता पॅनल विजयी झाले. तब्बल 58 वर्षानी ही निवडणूक पार पडली. पूर्वकडील क्रीडा संकुल मधील सुरेंद्र वाजपेयी बंदिस्त सभागृहात झालेल्या निवडणुकीत एकता पॅनल दमदारपणे निवडून आले होते. गुरुवारी एकता पॅनलने सर्वानुमते विजय भोईर यांची अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे जाहीर केले. त्यानंतर पश्चिमकडील डोंबिवली महानगरपालिका सेवक वर्ग सहकारी पतपेठीच्या कार्यालयात अध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला यावेळी पटपेढतील पदाधिकाऱ्यांनी विजय भोईर यांचे पुष्पगुच्छ देवून व पेढे भरवून अभिनंदन केले. पुढील पाच वर्षाच्या कार्यकारिणीत अध्यक्ष - विजय भोईर, उपाध्यक्ष - शरद पांढरे, कोषाध्यक्ष - अनघा पवार, सचिव - गणेश गोल्हे कामकाज पाहणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष विजय भोईर यांनी सांगितले.

## नागरी वस्तीतील गॅस सिलेंडर गोडाऊने रद्द करा

### राष्ट्रवादीची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ठाणे जिल्ह्यातील कल्याण व उल्हासनगर शहरात शेकडो लोकांचे जीव धोक्यात घालून नागरी वस्ती मध्ये गॅस सिलेंडर गोडाऊन चालविणारे गॅस एजन्सीची मान्यता रद्द करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

कल्याण आणि उल्हासनगर शहरातील काही गॅस एजन्सी व्यापाऱ्यांनी आपल्या आर्थिक फायद्यासाठी शेकडो नागरिकांच्या जीवाला धोक्यात घालून आपले गॅस एजन्सीचे गोडाऊन रहिवासी वस्तीत थाटले आहेत. मुळात गॅस एजन्सी मालकाला गॅस गोडाऊन रहिवासी वस्ती पासून लांब ठेवण्याच्या अटी व शर्तीवर गॅस परवाना दिला जातो, परंतु पळवाट म्हणून नियमाचे पालन करण्यासाठी एक गोडाऊन शहराच्या बाहेर ठेवले जाते व दुसरे वाहतुकीचा खर्च वाचवण्यासाठी तसेच ग्राहकांना जवळून सिलेंडर सप्लाय करण्यासाठी गोडाऊन शहराच्या रहिवासी वस्ती मध्ये ठेवले जाते.

असाच एक प्रकार समोर आला आहे की कल्याण शहरातील हिन्दुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस एजन्सी मालकाने त्यांचे अधिकृत गॅस गोडाऊन मोहने टिटवाळा परिसरात असल्याकारणाने त्यांना ट्रान्सपोर्टेशन महाग पडत असल्यामुळे त्यांनी सिलेंडर सप्लाय साठी एक अनधिकृत गोडाऊन रहिवासी वस्तीत कल्याण पश्चिम येतील डीबी चौक परिसरात कार्यरत ठेवले आहे. तसेच उल्हासनगर येथील हिन्दुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस एजन्सी मालकाने आपले सिलेंडर सप्लाय साठी गोडाऊन शान्तीनगर, उल्हासनगर ३, मध्ये भर रहिवासी वस्तीत थाटले आहे. जे कायद्याने मोठा गुन्हा असून या रहिवासी परिसरात जर कदाचित सिलेंडर स्फोट झाला तर या स्वार्थी गॅस एजन्सी मालकांमुळे शेकडो निष्पाप नागरिकांचे जीव जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी या विषयांची सखोल चौकशी करून गॅस एजन्सी मालकावर कठोर कारवाई करून गुन्हा नोंदवून गॅस एजन्सीचे परवाना रद्द करण्याची मागणी साळवे यांनी केली आहे.

## रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्याचे कल्याण दिवाणी न्यायालयाचे आदेश

### आदेश देऊन तेरा वर्षे उलटली तरी अतिक्रमण केलेला रस्ता जागेवरच!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : मुरबाड तालुक्यातील सरळगाव येथील विठ्ठल देशमुख यांच्या मालकीची कब्जा वहिवाटेची जागा सर्वे नंबर ४५/६ पैकी या जागेवर सन १९९९ मध्ये मुरबाड सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यावर अतिक्रमण करून रस्त्याचे काम चालू केले होते. याबाबत विठ्ठल देशमुख यांनी ५ सप्टेंबर १९९९ हरकत घेतली त्यानंतर ७ एप्रिल १९९९ रोजी जनरल मॅनेजर नाबार्ड यांना निवेदन दिले होते. यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले परंतु मी न्यायाची प्रतीक्षा करत होतो परंतु मला नाईलाजाने त्यानंतर १५ ऑक्टोंबर २००० मध्ये वरिष्ठ स्तर कल्याण दिवाणी न्यायालय कल्याण न्यायालय येथे दावा दाखल करण्यात आला. दाव्याचा नंबर १८/२००० या दाव्याचा निर्णय २९ मार्च २०१२ रोजी कल्याण दिवाळी न्यायालयाने सांगितले की रस्त्यावर केलेल्या अतिक्रमण बाबत विठ्ठल देशमुख यांना चालू बाजार भावा प्रमाणे त्यांना नुकसान भरपाई सहा महिन्याच्या आत द्यावी. भरपाई नाही दिली तर वादी यांचा दावा मिळकतीतल रस्त्याचे बांधकाम मुरबाड सार्वजनिक बांधकाम प्रतिवादी यांच्या स्वखर्चाने काढून टाकू त्यांना पूर्ववत जमिनीचा ताबा देण्यात यावा असा कल्याण दिवाणी न्यायालयाने दिला आहे. दिलेला आदेशाला आतापर्यंत तेरा वर्षे उलटली तरीही अजूनही प्रतिवादी सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिक्रमण केलेला रस्त्यावरचा बांधकाम काढून टाकले नाही या आदेशाला मुरबाड सार्वजनिक बांधकाम विभागाने केराची टोपली दाखवली का? अशी चर्चा सध्या सुरू आहे.

## चल बाला, आता भरणार 'आगरी शाला'

### 'आगरी शाला' या २ दिवसाच्या आगरी बोलीचे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, पालघर मधील स्थानिकांची बोली म्हणजे आगरी बोली. प्रसार माध्यमात तसेच विविध मालिकांमध्ये सर्रास वापरली जाणारी बोली तिच्या गोडव्यामुळे आपल्याला ठाऊक आहे. परंतू अनेकांना या भाषेचे नेमके पैलु माहित नाहीत. यंदाच मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे पंरतु तिच्या बोलीभाषा अजुनही दुर्लक्षित आहेत तसेच ईंग्रजी-हिंदीच्या वाढत्या प्रभावामुळे हल्ली आगरी बोलीचा वापर हा कमी होत चाल्ला असून परिणामी ही बोली बोलणाऱ्या वर्गाला ह्या भाषेचा विसर पडत चालला आहेच. ह्यावर उपाय म्हणून ज्यांना आगरी बोली शिकायची आहे वा तिच्याबद्दल अधिक माहिती मिळवायची आहे त्यांच्यासाठी भुमिपुत्र फाऊंडेशचे अध्यक्ष सुशांत पाटील आणि आगरी ग्रंथालय चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२७, २८ मे रोजी ठाण्यात टाऊन हॉल येथे 'आगरी शाला' या २ दिवसाच्या आगरी बोलीचे प्रशिक्षणवर्ग घेण्याचे ठरविले आहे.

आगरी ग्रंथालय चळवळीतील सर्वेश तरे, मोरेश्वर पाटील, दया नाईक, प्रकाश पाटील यांच्या मार्फत याआधीही आगरी बोली संवर्धनार्थ आगरी शाला, आगरी ग्रंथालय असे अनेक प्रयोग केले आहेत. आगरी शाला या उपक्रमात काही विषेश तज्ञ-मार्गदर्शकांचाही सहभाग असणार आहे. त्यात मराठी साहित्य मंडळाचे प्रा.एल बी पाटील, अग्रसेन मासिकाचे संपादक चंद्रकांत पाटील, हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे, आगरी बोली आणि संस्कृतीचे अभ्यासक मोरेश्वर पाटील, सिनेअभिनेता मयुरेश कोटकर तसेच लोकगीतातील गीतकार संगीतकार दया नाईक यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या 'आगरी शाला' प्रयोगा अंतर्गत सहभागी आगरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी लघु पाठ्यक्रम असलेलं पुस्तकही मिळणार आहे. ज्यात आगरी बोलीतील पद्य आणि गद्य चा समावेश असेल, याचे संपादन मोरेश्वर पाटील आणि सर्वेश तरे यांनी स्वत: केले आहे. या प्रशिक्षण वर्गासाठी जास्तीत जास्त आगरी भाषा प्रेमींनी मग ते कोणत्याही वयोगटातले असोत त्यांनी सहभाग घ्यावा असे युवा साहित्यिक सर्वेश तरे यांनी आवाहन केले असून इच्छूकांनी प्रवेशासाठी नोंदणीसाठी ९०९६७२०९९९/ ९८८११३३४४४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## कृषी योजनांचा लाभ मिळिवण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक अनिवार्य

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारक लाभ शेतकऱ्यांना देण्याच्या उद्दिष्टाने ॲग्रिस्टॅक योजना राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लैंड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरित्या तयार करण्यात येत आहे.

याद्वारे विविध योजनांचा लाभ देण्यासाठी शेतकऱ्यांची ओळख पटविण्याची सोपी पद्धत विकसित केली जाणार आहे. शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च गुणवत्तेची कृषी निविष्ठा, विपणन, तज्ञ मार्गदर्शन, बाजारपेठेची माहिती उपलब्ध करुन देणे सोयीस्कर होणार आहे.

शेतकऱ्यांचा माहिती संच तयार करण्यासाठी महसूल अभिलेखातील शेतकऱ्याची आणि शेताची माहिती घेऊन त्यानुसार शेतकऱ्याचा आधार क्रमांक हा त्या माहितीशी जोडून प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या शेतांसह एकत्रितरीत्या शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) देण्यात येत आहे. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाकरिता शेतकरी ओळखपत्र क्रमांक (Farmer ID) दि.15 एप्रिल 2025 पासून अनिवार्य करण्यात आला आहे.

याबाबतचा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप शेतकरी ओळखपत्र क्रमांक (Farmer ID) साठी नोंदणी केलेली नाही त्या शेतकऱ्यांनी तातडीने या पोर्टलवर नोंदणी करावी.

अधिक माहितीकरीता शेतकऱ्यांनी जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक, कोकण विभाग बालाजी ताटे यांनी केले आहे.

## जे.एस.डब्ल्यू कंपनी आणि निसर्गातील हरवलेले चक्र – सी.आर.म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पूर्वी बरोबर ७ जूनला पाऊस पडायचाच.अगदी दक्षिणेकडून मान्सूनचे जोरदार वारे वाहायचे, दोन तीन दिवस हा वारा न थांबता असायचा. वातावरणात गारवा, शुद्ध हवा ,लांबून डोंगराचे दर्शन व्हायचे, लहान मुले आनंदाने म्हणायचे डोंगर जवळ आलेत. म्हणजे हवामान स्वच्छ असायचा. पाऊस पडल्यावर पिवळसर, हिरव्या रंगाचे बेडूक त्यांचा तो डराव डराव आवाज, विविध प्रकारचे साप, विषारी, बिनविषारी दिसायचे.झाडे खूप असल्याने कावळे त्यांचे घरटी मोठ्या प्रमाणावर बनवताना दिसायचे. मात्र आत्ता जेएसडब्ल्यू कंपनी आणि इतर प्रदूषण निर्माण करणारे कारखाने यामुळे ही सर्व निसर्ग चक्र बदलत आहे. पावसाळयातया कंपनीच्या परिसरात उष्णतेमुळे काळे ढग विरून जाताना दिसतात. एवढी भयाण दाहकता असल्याने ती पुढे वाढेल.पाऊस पडल्यावर समुद्रातील मासे पकडण्यासाठी असलेली धडपड. आणि त्यातून मिळणारे आनंद वेगळेच असायचे. आत्ता मात्र मासे मिळतात पण केमिकलचे वास येणारे.



जून ते सप्टेंबर पावसाचे महिने. या महिन्यात पडणाऱ्या पावसाचा अंदाज पूर्वी शेतकऱ्यांना असायचा मात्र आत्ता या कारखानदारीमुळे पाऊस पडला तर एकदा खूप पडतो आणि पुढील काही दिवस बेपत्ता होतो. थोडक्यात मोठ्या प्रमाणावर अनिश्चितता आली आहे. याचा परिणाम शेतकरी बांधव शेती करायला तयार नसतात.

वडखळ... पासून शहाबाजपर्यंत पावसाळयात हिरवीगार शेती पाहायला मिळायची पण आत्ता शेती विकल्यामुळे हा परिसर वाळवंट सारखा दिसत आहे. पावसानंतर हिवाळ्यात दिसणारे दवबिंदू, दुर्लभ झाले आहेत, थंडीचे दिवस संपले, हिवाळा कधी सुरू झाला आणि संपला हे समजत नाही.थोडक्यात या कारखानदारीमुळे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. या परिसरात १५/१५ दिवस सूर्य दर्शन नसायचे एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस पडायचा, आत्ता ते चित्र बदलत आहे.या कंपनीतून निघणारे धूर आणि येणारा डांबर जळल्याचा वास, चिमणीतून निघणारी काळी काजळी मोठ्या प्रमाणावर त्या परिसरात नव्हे तर पाच सहा किलोमीटरपर्यंत पसरलेली दिसून येते. श्वसनाचे आजार, लोखंडाचे सूक्ष्म कण, यामुळे परिसरातील लोकांचे आयुष्यमान घटत आहे असे म्हणायला हरकत नाही. कंपनी पेण परिसरात मात्र नोकऱ्या पाहिजे त्या प्रमाणात स्थानिकांना मिळाल्याचे दिसून येत नाही. निप्पॉन, इस्पात कंपनी आत्ता जे.एस.डब्ल्यू असे नामकरण करून विविध नवीन प्लांट वाढून परिसर गिळंकृत करत आहे आणि कित्येक पिढ्यांची जपणूक करणारी ही भात शेती संपत चालली आहे. चार महिन्यात तयार होणारे हे पिवळे सोने जी सर्व कुटुंबाची काळजी घेत आहे ती आत्ता अखेरची घटका मोजताना दिसत आहे. एकंदरीत हे निसर्ग चक्र असेच राहिले तर याला या कंपन्या जबाबदार राहणार आहेत.एकतर मनुष्याचे जीनं हैराण होऊन जाईल अशी परिस्थिती असल्यामुळे आपण वेळीच काळजी घेतली पाहिजे अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सि.आर.म्हात्रे यांनी दिली.

## ठाणे कोषागार कार्यालयातील निवृत्तीवेतन धारकांना आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे कोषागार कार्यालयातून निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतन धारकांना हयातीचा दाखला, निवृत्तीवेतन धारकाचे निधन झाल्याचे कळविण्याबाबत नमुना, कुटुंबनिवृत्ती वेतन सुरु करण्याकामी सर्व नमुना अर्ज, कोषागार बदल तसेच बँक / शाखा बदल बाबतचे नमुना अर्ज व इतर पत्रव्यवहार यापुढे त्यांच्या नजिकच्या उपकोषागार कार्यालयास सादर करता येणार आहेत.

तरी, सर्व निवृत्तीवेतन धारक व कुटुंबनिवृत्तीवेतन धारक यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी महेशकुमार कारंडे यांनी आहे.

## कल्याणमध्ये 'हा खेळ सावल्यांचा' कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सुभेदार वाडा कट्टा आणि आकाश मित्र मंडळ यांच्यावतीने शून्य सावली दिनानिमित्त हा खेळ सावल्यांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. यावेळी खगोल अभ्यासक हेमंत मोने उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम शनिवारी, 17 मे रोजी दुपारी 11.30 ते १२.४० यावेळेत सुभाष मैदान, अत्रे रंगमंदिरामागे, कल्याण (प.) येथे होणार आहे. संपर्क क्रमांक. संजय पांडे 9819288680

## उल्हानसनगरातील लुटीचा तपास अद्याप अंधारातच

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगरात तब्बल साडेतीन कोटींच्या सोन्याच्या धक्कादायक लुटीला दोन वर्षांचा कालावधी होत आला, तरी तपास अद्याप अंधारातच आहे. शहरातील कॅम्प क्रमांक १ येथील 'विजयालक्ष्मी ज्वेलर्स' दुकानातील ही घटना सुरक्षारक्षकाच्याच मदतीने घडली होती. पोलिसांनी तातडीने कारवाई करत ३० लाखांचे सोने जप्त करत तीन आरोपींना अटक केली; परंतु सव्वा तीन कोटींपेक्षा अधिकचे सोने आणि मुख्य सूत्रधार अद्यापही बेपत्ता आहेत. विशेष म्हणजे, या तपासासाठी पोलिसांचे पथक थेट भारत-नेपाळ सीमेपर्यंत गेले होते. तरीही लुटीमागील उर्वरित साखळी हाती लागलेली नाही. परिणामी, तपास यंत्रणांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

२८ जून २०२३ मध्ये उल्हासनगर कॅम्प १ येथील प्रसिद्ध 'विजयालक्ष्मी ज्वेलर्स'मध्ये काम करणाऱ्या सुरक्षारक्षक महेश नेपाळीने आपल्या साथीदारांसह रात्रीच्या सुमारास दुकानातील तिजोरी गॅस कटरच्या साह्याने फोडली. या घटनेत तब्बल सहा किलो सोने अंदाजे साडेतीन कोटी रुपये किमतीचे लंपास करण्यात आले होते.

घटनेनंतर महत्त्व लक्षात घेऊन उल्हासनगर पोलिसांसह गुन्हे शाखेच्या आठ विशेष पथकांनी तपासाला गती दिली. एका आठवड्यात तिघांना अटकही करण्यात आली आणि ३० लाखांचे सोने हस्तगत करण्यात आले, मात्र, यानंतर मुख्य सूत्रधार आणि उर्वरित सव्वा तीन कोटींच्या सोन्याचा मागमूसही सापडलेला नाही. दोन वर्षांपूर्वी घडलेला हा कोट्यवधींचा गुन्हा अजूनही अर्थवट तपासात अडकलेला आहे. तपास यंत्रणांनी सुरुवातीला झपाट्याने कारवाई केली; पण नेपाळ सीमेवर पोहोचूनही आरोपींना गाठण्यात अपयश आल्याने संपूर्ण तपास रेंगाळलेला आहे.

### तपासात अडथळे

सीने छूट प्रकरणातील काही आरोपींनी नेपाळमार्गे पलायन केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला होता. मात्र, नेपाळमध्ये तपासासाठी जाण्यासाठी भारत आणि नेपाळ सरकारच्या परराष्ट्र खात्यांची औपचारिक परवानगी, न्यायालयीन प्रक्रिया आणि वेळखाऊ सरकारी नियमांची पूर्तता करणे अत्यावश्यक असते. याशिवाय, विनापरवानगी गेलेल्या अधिकाऱ्यांना नेपाळमध्ये अटक करून कारागृहात डांबले जाण्याची धास्ती पोलिसांनी व्यक्त केली. त्यामुळे पुढील तपासात अडथळे निर्माण झाले आणि आरोपी शोधण्यात अपयश आले.

### न्याय मिळेल का?

'विजयालक्ष्मी ज्वेलर्स'चे मालक दिलीप बदलानी यांनी सांगितले की, फक्त ३० लाखांचे सोने परत मिळाले आहे. उर्वरित सोने अद्यापही मिळालेले नाही आणि अन्य आरोपीही सापडलेले नाहीत. आम्हाला न्याय मिळेल का, हा प्रश्न उरतोच आहे.

### पोलिसांचे अनपेक्षित उत्तर

उल्हासनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक आणि गुन्हे निरीक्षकांना या प्रकरणाबाबत विचारणा केल्यावर, ही घटना दोन वर्षांपूर्वीची आहे. तपशील माहिती घेऊन सांगावे लागेल, असे सांगून प्रतिक्रिया देण्याचे टाळले. तर उल्हासनगर परिमंडळ ४चे पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांनी 'प्रकरणाचा आढावा घेत माहिती घेतो', अशी प्रतिक्रिया दिली.

### पोलिस यंत्रणांवर गंभीर प्रश्न

* दोन वर्षे उलटूनही सव्वा तीन कोटींच्या सोन्याचा शोध लागत नसल्याने तपास यंत्रणांची कार्यक्षमता संशयाच्या भोवऱ्यात आली आहे.
* आंतरराष्ट्रीय सहकार्य, धोरणात्मक अडथळे आणि वेळखाऊ प्रक्रियेमुळे गुन्हेगार मोकाट फिरत आहेत.
* गुन्हेगारांना पकडण्यात आलेल्या अपयशामुळे उद्योजकांमध्ये असुरक्षिततेची भावना बळावली आहे.






'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024